सात गावठी पि

गोदातीर दि 03/10/23

# नांदेड शहरात ११६ जिवंत काडतूसांसह ७ पिस्टल जप्त

## चार आरोपींना अटक

**नांदेड–** शहरात विक्रीसाठी आणण्यात आलेल्या तब्बल ७ पिस्टल आणि ११६ जिवंत काडतूसे पोलिसांनी जप्त केल्या आहेत. याप्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही वाघी ते नाळेश्वर रस्त्यावरील आर. टी. ओ. ऑफीसजवळ करण्यात आली, अशी माहिती पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दि. २ आक्टोबर रोजी वाघी ते नाळेश्वर जाणारे रोडवरील आर. टी. ओ. ऑफीसजवळ काही इसम पिस्टल खरेदी व विक्री करण्यासाठी येणार असल्याची पक्की माहिती पोलिसांना मिळाली. सदरची माहिती वरिष्ठांना देवून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, सपोनी रवि वाहुळे, फौजदार दत्तात्रय काळे व पोलीस अंमलदारासह नाळेश्वर जाणाऱ्या रोडवरील आर. टी. ओ. ऑफीसजवळ गेले असता पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पोलिसांवरच हल्ला करण्याचा प्रयत्न करीत पळ काढण्याचा प्रयत्न केला. आरोपी कमलेश ऊर्फ आशु पाटील बालाजी लिंबापुरे (वय २३ वर्ष, रा. गॅस गोडाऊनजवळ वसरणीरोड, नांदेड), बलबिरसिंघ ऊर्फ शेरा प्रतापसिंघ जाधव (वय २१ वर्ष, रा. गुरु रामदास यात्री निवास, हिंगोली गेट, नांदेड), शेख शाहबाज शेख शकील (वय २३ वर्ष, रा. दुध डेअरी, रहीमपुर, नांदेड) व शामसिंघ ऊर्फ शाम्या गेंदासिंघ मठवाले (वय २३ वर्ष, रा. गुरुव्दारा गेट नं.२, तहसिल ऑफीसच्या मागे, नांदेड) यांनी पोलिसांवर हल्ला चढवला. पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी योग्य बळाचा वापर करुन त्यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून बेकायदेशीरीत्या मोठ्या प्रमाणात खरेदी - विक्रीसाठी आणलेले ७ पिस्टल (अग्नीशस्त्र) व ११६ जिवंत काडतूस असा एकूण तीन लाख तीन हजार रुपये किंम तीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.




सदर आरोपीतांनी हैद्राबाद येथे आशिष सपुरे व रबज्योतसिंघ ऊर्फ गब्या तिवाना दोघेही रा. नांदेड यांच्यासह नांदेड येथे मोठया प्रमाणात गावठी पिस्टल पुरविण्याचे कटकारस्थान रचले होते. त्यासाठी आशिष सपुरे व रबज्योतसिंघ ऊर्फ गब्या तिवाना हे दोघेही पैसे पुरवित होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराव धरणे म ार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, सपोनि रवि वाहुळे, सपोनि पांडूरंग माने, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, आशिष बोराटे, सचिन सोनवणे, गोविंद मुंडे, सपोउपनि माधव केंद्रे, पोहेकॉ गुंडेराव करले, पोहेकॉ बालाजी तेलंग, पोना दिपक पवार, पोना संजीव जिंकलवाड, पोको बालाजी यादगीरवाड, पोकॉ विलास कदम, पोकों तानाजी येळगे पोकों गजानन बयनवाड पोकॉ देवा चव्हाण, पोकों रणधिरसिंह राजबन्सी, पोकों ज्वालासिंघ बावरी, चापोकॉ हनुमान ठाकूर, चापोकॉ शेख कलीम, चापोकॉ बालाजी मुंडे व सायबर सेलचे पोहेकॉ दिपक ओढणे व पोहेकॉ राजू सिटीकर यांनी पार पाडली.

CMYK